# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 2)





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

राज्य साक्षरता केंद्र

## उल्लास प्रवेशिका (भाग - 2)

- **प्रेरणा :**
  **मा. ना. दिपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. रनजीत सिंह देओल**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शन :**
  **श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.),
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. उषा शर्मा,** प्रोफेसर एवं प्रभारी,
  राष्ट्रीय साक्षरता केंद्र– कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **श्री. रमाकांत काठमोरे,** सहसंचालक,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती व संपादन :**
  **डॉ. नेहा बेलसरे,** उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. रत्नमाला खडके,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला (महाराष्ट्र).
  **डॉ. मंजुषा क्षीरसागर,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे (महाराष्ट्र).
- **निर्मिती, संपादन व सल्लागार – हिंदी उल्लास (CNCL) :**
  **श्रीम. बाणी बोरा,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **याचना गुप्ता,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **शिवा श्रीवास्तव,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **रोहित नैनवाल,** सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **सोनाली,** कनिष्ठ प्रकल्प सहायक, राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
- **समन्वयक :**
  **डॉ. गितांजली बोरुडे,** विभाग प्रमुख,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. सचिन चव्हाण,** विभाग प्रमुख,
  सामाजिकशास्त्र विभाग , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. पंढरीनाथ जाधव,** अधिव्याख्याता,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. अण्णासाहेब कुटे,** विषय सहायक,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तांत्रिक साहाय्य व डिझायनिंग :**
  **श्री. स्वप्निल वैरागडे**, शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा महाबळा, ता. सेलू, जि. वर्धा.
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
  **श्री. सुभाष जीवा राठोड**, कलाशिक्षक, दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू, जि. वर्धा.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर, 2023
- **अर्थसाहाय्य :** राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.


# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 4. | आपल्या अवती-भोवती | 91 |
| 5. | आहार आणि आरोग्य | 123 |
| 6. | मतदान | 157 |
| 7. | कायदेविषयक माहिती | 177 |

**संवादासाठी -**

सहभागींसोबत शेती, शेतकरी इत्यादी बाबींसंदर्भात चर्चा करा. त्यांना हेही विचारा -

1) दिलेल्या चित्रात एकूण किती खाटा आहेत? 2) दिलेल्या चित्रात एकूण किती घरे दिसत आहेत? 3) दिलेल्या चित्रात एकूण किती लोक दिसत आहेत? 4) दिलेल्या चित्रात एकूण किती प्राणी आहेत?




सुनीता

# 4. आपल्या अवती-भोवती

**आपण शिकूया!**

| ए | ऐ | ज | भ | ड | श | ष | ं | े | ः | ॲ | ऑ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

- 51 ते 100 पर्यंतच्या संख्या ओळखणे, वाचणे व लिहिणे.
- 1 ते 50 पर्यंत बेरीज व वजाबाकी करणे. (हातच्याची)
- 51 ते 100 पर्यंत बेरीज आणि वजाबाकी करणे. (बिन हातच्याची)

## पाहा, वाचा आणि संवाद करा.


जंगल


विहीर


पाऊस


झरा

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- वर दिलेले शब्द वाचण्यासाठी सहभागींना मदत करा.
- चित्रावरून अंदाज बांधण्यासोबतच त्यांना वाढते अक्षरज्ञान व वाढत्या शब्दसंग्रहाचा वापर करण्यास प्रेरित करा.



सूर्य



प्राणी



डोंगर



धूर

■ *वाचा आणि अक्षर लिहा.*

ए



ए.टी.एम.



एडका

1


■ *चित्र पाहा आणि शब्द लिहा.*

## ▪ वाचा आणि अक्षर लिहा.

ऐ



ऐरावत



ऐरण



## ▪ चित्र पाहा आणि कृतीदर्शक शब्द लिहा.

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- चित्र पाहून शब्द वाचण्यासाठी सहभागींना मदत करा.
- दिलेल्या जागेत चित्राचे नाव लिहून घ्या.
- सहभागींकडून अक्षर लिहून घ्या.

## वाचा आणि अक्षर लिहा.

ज



जग



जादूगार




जहाज

| | | | |
|---|---|---|---|
| जमीन | जलद | जया | जव |
| जप | जन | जेवण | जिल्हा |
| जीभ | जड | जैन | जोखड |

ज

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



जिराफ



जीभ

जग



**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- चित्र पाहून शब्द वाचण्यासाठी सहभागींना मदत करा.
- दिलेल्या जागेत चित्राचे नाव लिहून घ्या.
- सहभागींकडून अक्षर लिहून घ्या.

## वाचा आणि अक्षर लिहा.

भ



भजी



भांडे



भाकरी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भजन | भट | भय | भर | भात | भाऊ |
| भेट | भेंडी | भिजणे | भीमा | भंग | नभ |
| भुवई | भाट | भिंगरी | भिमा | भुंकणे | भोवरा |

भ

भ

भ

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



भाला



भोवरा



भाजी



भोपळा

## वाचा आणि अक्षर लिहा.

श



शहामृग



शहाळे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शरद | शहर | शेती | शीळ | शहाणा | शेगडी |
| शिमला | शुभ | शरण | शहीद | शाळा | शाल |
| शिधा | शिडी | शोभा | शारदा | शतक | शिळा |

श्र

श्र


## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



शिडी




शाळा



शेतकरी



शेळी

## वाचा आणि अक्षर लिहा.

**ष**



षटकोन



इंद्रधनुष्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पोषण | आषाढ | कोष | भाषण | पुरुष | दोषी |
| विष | भाषा | विशेष | भीषण | प्रदूषण | घोषणा |
| आभूषण | मनिषा | षटक | षड्यंत्र | षष्ठी | षोडश |

ष

ष

■ *वाचा आणि अक्षर लिहा.*

ड



डमरू



डोळा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| डबा | डबके | डास | वेड | कडक | तडा |
| रडणे | दगड | घोडा | डोह | गडबड | कडे |
| डफ | डगमग | डबी | डाग | डहाळी | डसणे |
| डोळा | डोली | डेरा | | | |

ड

ड

■ *वाचा आणि अक्षर लिहा.*

## अं



अंगठी



अंडे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंकुर | अंक | अंकित | अंगण | अंग | अंजन |
| अंकुश | अंकगणित | अंजीर | अंगाई | अंगरखा | अंगुली |
| अंगभर | अंघोळ | अंत | अंतराळ | अंतर | अंतरंग |

## अः



नमः

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रातः | शतशः | दुःख | स्वतः | मनःपूर्वक |
| अंतःकरण | पूर्णतः | अंतःप्रेरणा | उषःकाल | प्रातःकाळ |
| निःशेष | निःशब्द | निःशंक | निःशस्त्र | अंततः |

## वाचा आणि अक्षर लिहा.

अॅ



बॅट



बॅग

| | | | |
|---|---|---|---|
| मॅच | गॅरंटी | कॅरम | गॅस |
| कॅमेरा | मॅडम | कॅलेंडर | फॅन |

ऑ




बॉल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कॉट | सॉस | गॉगल | मॉल | कॉलेज |
| ऑगस्ट | हॉल | डॉक्टर | बॉक्स | |

टीप : सदरचे शब्द इंग्रजी उच्चाराचे आहेत.

■ तुमच्या घराजवळ यांपैकी काय काय आहे? चित्राखालील चौकटीत बरोबरचे चिन्ह (✓) द्या.



☐

वडाचे झाड



☐

बाग



☐

रेल्वे स्टेशन



☐

दुकान




शाळा




रुग्णालय



शेत



देऊळ

## ▪ वाचा आणि एकमेकांशी संवाद साधा.

### वडगावची गोष्ट

वडगाव नावाचे एक गाव होते. तिथले सगळे जंगल कापले गेले होते. विहिरीला व हातपंपाला पाणी नव्हते. नदीचे पाणी फारच कमी आणि गढूळही झाले होते. सन 1970 साली हे गाव पार बदलले. वडगावला एक ग्राम समिती गठीत झाली. ग्राम समितीने एकमताने निर्णय घेतला, की आधी जंगल वाचवायचे.



पावसाचे पाणी जमा करणे आणि जमिनीत मुरवणे यासाठी एक मोठी सिंचन टाकी तयार करण्यात आली. सिंचन टाकीच्या चारही बाजूंनी झाडे लावण्यात आली. मुलांनीही झाडे लावली. काम कठीण होते, पण गावकऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली. पाहता पाहता पाच वर्षांत वडगाव एक सुजल व आनंदी गाव झाले.

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

वर दिलेली गोष्ट सहभागींना वाचून ऐकवा आणि याच प्रकारच्या अन्य गोष्टी सांगण्यास सांगा. झाड, जंगल, पाण्याचा काटकसरीने वापर इत्यादी संदर्भात पर्यावरण संरक्षण या संदर्भात चर्चा करा. पर्यावरण संरक्षण संदर्भात सहभागींसोबत संवाद साधा / चर्चा करा.

## ▪ खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

प्रश्न 1. तुमच्या गावाचे नाव लिहा.

प्रश्न 2. तुमच्या घरी वापरण्यासाठी तुम्ही पाणी कोठून आणता? ते लिहा.
नळ , पंप , तलाव , नदी , विहीर , टाकी


प्रश्न 3. तुम्ही तुमच्या घरी वापरण्याचे पाणी कशात भरून ठेवता? ते लिहा.
पेला, मडकी, बाटली, बरणी, बादली , पिंप, घागर, रांजण, हंडा

प्रश्न 4. तुमच्या परिसरातही पाणी टंचाई आहे का? पाणी टंचाईची कोणती कारणे आपल्या लक्षात येतात? चर्चा करा.

प्रश्न 5. शुद्ध पाणी पिण्याचे फायदे सांगा. चर्चा करा.

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**
वर दिलेल्या प्रश्नांवर चर्चा करा आणि उत्तर लिहिण्यासाठी सहभागींना मदत करा. सहभागी रकान्यात दिलेल्या शब्दांची मदत घेऊ शकतात. प्रश्न 4 वर विशेष संवाद / चर्चा करा. शुद्ध पाणी पिण्याचे फायदे या विषयावर चर्चा करा.

## ▪ चला, चर्चा करूया !



महावितरण

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन कंपनी लि.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Note: while saving/printing the bill in .PDF format please tick Background Graphics option and Margins to none in More settings.

Print / Download

वीज पुरवठा देयक माहे: DEC-2022

Website :www.mahadiscom.in
GSTIN of MSEDCL 27AAECM2933K1ZB
BILL NO.(GGN): 000001819576936

HSN code 27160000

ग्राहक क्रमांक: 390107028733
SWAPNIL MAROTRAO VAIRAGADE
1327 SELOO 442104
मोबाइल/ इमेल: 95******71/swa**************@gmail.com

देयक दिनांक: 08-DEC-22
देयक रक्कम रु: 1,270.00
देय दिनांक: 28-DEC-22
या तारखे नंतर भरल्यास: 1,280.00

बिलींग युनिट: 3808 :SELU RURAL S/DN
दर संकेत: 090 /LT-I (B) Residential 1Ph
पोल नं: 00000012
पी.सी./चक्र+मार्ग-क्रम/डि.टी.सी.: 2 / 22-6025-2634 /4370032
मिटर क्रमांक: 06507999234
रिडिंग ग्रुप: C2

पुरवठा दिनांक: 20-Apr-2015
मंजुर भार: .62 KW
सुरक्षा ठेव जमा(रु): 729.46
चालु रिडिंग दिनांक: 03-DEC-22
मागील रिडिंग दिनांक: 03-NOV-22

| चालु रिडिंग | मागील रिडिंग | गुणक अवयव | युनिट | समा. युनिट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 7995 | 7850 | 01 | 145 | 0 | 145 |

NORMAL
Bill Period: 1 Month(s) /

Scan this QR Code with BHIM App for UPI Payment

QR कोडद्वारे भरणा केल्यास, भरणा दिनांकानुसार लागू असलेली तत्पर देयक भरणा सूट किंवा विलंब आकार पुढील देयकात समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्रातील सेलू तालुक्यातील एका घराचे वीज बिल

### ▪ वर दिलेले वीज बिल पहा. बिलावर वर्तुळ (गोल) करून आपले उत्तर नोंदवा.

प्रश्न 1. हे वीज बिल आहे असे बिलाच्या कोणत्या भागातून कळते?

प्रश्न 2. हे बिल कोणत्या महिन्याचे आहे?

प्रश्न 3. या वीज बिलामध्ये चालू रीडिंग किती आहे?

प्रश्न 4. या वीज बिलाची एकूण देयक रक्कम किती रुपये आहे?

प्रश्न 5. या वीज बिलामध्ये वीज कंपनीचे नाव कुठे आहे?

प्रश्न 6. कोणत्या तारखेनंतर वीज बिल भरल्यास जास्तीची देयक रक्कम भरावी लागेल?

प्रश्न 7. वीज बिल भीम ॲपने (BHIM APP) ने ऑनलाईन (ONLINE) भरण्यासाठी कोणता क्युआर कोड (QR CODE) स्कॅन करावा लागेल?



**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

आधी बिलाचा तपशील द्या. दिलेल्या प्रश्नावर सहभागींसोबत चर्चा करा आणि बिलाच्या उत्तरासाठी चित्रातील योग्य ठिकाणी वर्तुळ करावयास सांगा.

# श्यामची आई

फुलांची माळ बनवताना श्याम त्याच्या आईला मदत करीत असे. तो एक एक करून फुले आईला द्यायचा व फूल देताना संख्या मोजायचा. 10 फुलांची एक माळ म्हणजे एका माळेत 10 फुले. श्याम फुले देत गेला आणि माळा बनत गेल्या. चला तर मग समजून घेऊ या, किती फुले ओवल्यावर एक माळ तयार होते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 50 + 1 = 51 | पाच दशक  | + | एक एकक  | = | 51 एक्कावन्न |
| 50 + 2 = 52 | पाच दशक  | + | दोन एकक  | = | 52 बावन्न |
| 50 + 3 = 53 | पाच दशक  | + | तीन एकक  | = | 53 त्रेपन्न |
| 50 + 4 = 54 | पाच दशक  | + | चार एकक  | = | 54 चोपन्न |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 50 + 5 = 55 | पाच दशक  | + | पाच एकक  | = | 55 पंचावन्न |
| 50 + 6 = 56 | पाच दशक  | + | सहा एकक  | = | 56 छप्पन्न |
| 50 + 7 = 57 | पाच दशक  | + | सात एकक  | = | 57 सत्तावन्न |
| 50 + 8 = 58 | पाच दशक  | + | आठ एकक  | = | 58 अठ्ठावन्न |
| 50 + 9 = 59 | पाच दशक  | + | नऊ एकक  | = | 59 एकोणसाठ |
| 50 + 10 = 60 | पाच दशक  | + | एक दशक  | = | 60 साठ |

## दशक आणि एककाची बेरीज

| | | |
|---|---|---|
| 60 + 1 | = | 61 |
| 60 + 2 | = | 62 |
| 60 + 3 | = | 63 |
| 60 + 4 | = | 64 |
| 60 + 5 | = | 65 |
| 60 + 6 | = | 66 |
| 60 + 7 | = | 67 |
| 60 + 8 | = | 68 |
| 60 + 9 | = | 69 |
| 60 + 10 | = | 70 |

| | | |
|---|---|---|
| 70 + 1 | = | 71 |
| 70 + 2 | = | 72 |
| 70 + 3 | = | 73 |
| 70 + 4 | = | 74 |
| 70 + 5 | = | 75 |
| 70 + 6 | = | 76 |
| 70 + 7 | = | 77 |
| 70 + 8 | = | 78 |
| 70 + 9 | = | 79 |
| 70 + 10 | = | 80 |

| | | |
|---|---|---|
| 80 + 1 | = | 81 |
| 80 + 2 | = | 82 |
| 80 + 3 | = | 83 |
| 80 + 4 | = | 84 |
| 80 + 5 | = | 85 |
| 80 + 6 | = | 86 |
| 80 + 7 | = | 87 |
| 80 + 8 | = | 88 |
| 80 + 9 | = | 89 |
| 80 + 10 | = | 90 |

| | | |
|---|---|---|
| 90 + 1 | = | 91 |
| 90 + 2 | = | 92 |
| 90 + 3 | = | 93 |
| 90 + 4 | = | 94 |
| 90 + 5 | = | 95 |
| 90 + 6 | = | 96 |
| 90 + 7 | = | 97 |
| 90 + 8 | = | 98 |
| 90 + 9 | = | 99 |
| 90 + 10 | = | 100 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 90 + 10 = 100 | नऊ माळा म्हणजे नऊ दशक  | + | एक माळ म्हणजे एक दशक  | = | शंभर (शतक) 100 |

## माझे शब्द

**सूचना :**

आतापर्यंत शिकलेल्या शब्दांचे लेखन पाहून तसेच शक्य असल्यास न पाहता लिहिण्यास सांगावे.

## रिकाम्या जागी योग्य क्रमाने संख्या लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | | 13 | 14 | | | 17 | | | 20 |
| 21 | | | 24 | | | | | | |
| | | | | | 36 | | | | |
| | | 43 | | | | | | 49 | |
| | 52 | | | | 56 | | | | |
| 61 | | | 64 | | | 67 | | 69 | |
| | | 73 | | | | | | | 80 |
| | | | 84 | | | | 88 | | |
| 91 | | 93 | | | 96 | | | | 100 |

- 68 आणि 78 पैकी कोणती संख्या मोठी आहे ते लिहा.

  ☐ पेक्षा ☐ मोठी आहे.

- सारिकाने गुलाबाचे एक रोपटे 53 रुपयांना आणि झेंडूचे रोपटे 28 रुपयांना विकत घेतले, तर सारिकाने एकूण किती रुपये खर्च केले?

गुलाबाच्या रोपट्याची किंमत ₹ 53







झेंडूच्या रोपट्याची किंमत ₹ 28







सारिकाचा एकूण खर्च ₹







₹ ☐

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

सहभागींना प्रोत्साहित करा; जेणेकरून त्यांनी संख्यांची तुलना करण्यासाठी वेगवेगळे मार्ग/पद्धती शोधाव्यात.

- सारिकाजवळ 60 रुपये आहेत. तिला झेंडूचे एक रोपटे घ्यायचे आहे, झेंडूच्या रोपट्याची किंमत 28 रुपये आहे, तर तिच्याजवळ किती रुपये शिल्लक राहतील?

| | | |
|---|---|---|
| सारिकाजवळ ₹ 60 आहेत. |  |  |
| झेंडूच्या रोपट्याची किंमत ₹ 28 |  |  |
| सारिकाजवळ ₹ ☐ शिल्लक राहिले. |  |  |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

सहभागींना विविध संदर्भ असणारी बेरीज व वजाबाकीची उदाहरणे द्यावीत. जिथे त्यांना संख्यांचे गट करता येतील.
पर्यावरण संरक्षणावरही चर्चा करा.

▪ **सोबत वाचा !**

## समुद्रातून पाणी कुठे जाते ?

छोटे ओहोळ, झरे, दलदलीचा भाग यांच्यातील पाणी वाहून नाल्यांमध्ये जाते; नाल्यांमधून छोट्या नद्यांमध्ये, छोट्या नद्यांमधून मोठ्या नद्यांमध्ये मग या सर्व नद्यांकडून चारही बाजूने येत समुद्रास मिळते. हे जग अस्तित्वात आल्यापासून असे घडते आहे. मग समुद्रातून पाणी कुठे जाते? ते किनाऱ्या बाहेर का जात नाही?

समुद्रातील पाण्याची वाफ बनते. वाफ वर जाऊन ढग तयार होतात. वारा ढगांना उडवतो. दूर-दूर पर्यंत पसरवतो. ढगांमधून पाणी पावसाच्या रूपाने जमिनीवर पडते. जमिनीवरून वाहत पाणी दलदल आणि नाल्यांकडे जाते. नाल्यांकडून नद्यांकडे व नद्यांकडून समुद्रात, समुद्रातून पाणी पुन्हा वाफ होऊन वर जाते आणि त्याचे ढग बनतात. वारा ढगांना उडवतो व दूर-दूर पर्यंत नेतो.

*मूळ स्रोत- लियो टॉल्स्टॉय*



**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**
सहभागींना गटात एकत्रित वाचन करण्यास प्रोत्साहित करावे, सहभागींना अडचण आल्यास स्वत: वाचन करून दाखवावे व नंतर त्यांचेकडून वाचन करून घ्यावे.

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

सहभागींना प्रोत्साहित करा जेणेकरून ते पाण्याच्या विभिन्न स्रोतावर चर्चा करतील. तलाव, नदी, समुद्र यांची स्वच्छता आणि संरक्षण याबद्दलही एकमेकांशी संवाद/चर्चा करणे.

शब्द लेखन व वाक्य लेखन करण्यास सांगा.

## टिपण


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

ए, ऐ, ज, भ, ड, श, ष, ॲ, ऑ या अक्षरांचे व शब्दांचे लेखन करण्यास सांगा.

१ ते १०० संख्यांचे लेखन करण्यास सांगा.

संवादासाठी :

1. चित्रात दिलेल्या जागांच्या स्वच्छतेच्या संदर्भाने आपण काय सुचवाल?
2. तुमच्या आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता कशी राखली जाते?
3. स्वच्छतेबद्दल जागरूक राहणे का गरजेचे आहे ?
4. उघडे पदार्थ खाल्ल्याने कोणते नुकसान होते?
5. जेवणापूर्वी हात धुणे का गरजेचे आहे?




रफीक भाई फूलवाले
चाय वाले
हात धुणे
गरजेचे

# 5. आहार आणि आरोग्य

**आपण शिकूया!**


| उ | ऊ | ह | छ | थ | फ | ठ |
|---|---|---|---|---|---|---|

- 100 ते 1000 पर्यंतच्या संख्या ओळखणे, वाचणे व लिहिणे.
- एकक, दशक आणि शतकाला समूहात मोजणे.
- एक अंकी संख्यांचा गुणाकार.


## ▪ *चित्रावरून अंदाज बांधा व वाचा.*



ऊस



फळे



स्वच्छ हात



उकिरडा




दूध



औषध



व्यायाम



कचरापेटी



साबण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- वर दिलेली चित्रे आहार आणि आरोग्य या संदर्भात दिलेली आहेत. शब्द वाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांना चित्रांचा अंदाज बांधणे, तसेच त्यांचा वाढता शब्दसंग्रह व अक्षरज्ञान यांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करा.
- आहार, आरोग्य, स्वच्छता इत्यादी बाबींवर चर्चा करा.

## जाहिरात









आपण डासांना निमंत्रण देताय का?

## सावधान !

यामुळे आपल्याला मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया होऊ शकतो.
आजूबाजूला डबके साचू देऊ नका. खड्डे बुजवा.
पाण्याची भांडी, टाक्या, कुलर स्वच्छ ठेवा. ती दर आठवड्याला कोरडी करा.
डबक्यातील पाण्यात गप्पी मासे सोडा.

## संभाषणासाठी

1. अशी जाहिरात तुम्ही कुठे पाहिली आहे का?
2. या पोस्टरमध्ये कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे?
3. असे पोस्टर कोण लावत असेल?
4. वृत्तपत्रात अशा प्रकारची जाहिरात कोण देत असेल?
5. तुमच्या परिसरात किती व्यक्ती डेंग्यूने आजारी पडल्या होत्या, ते शोधून काढा.
6. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांवर चर्चा करा.

1. जाहिरातीमधील काही शब्द खाली दिलेले आहेत.

| मलेरिया | डेंग्यू | चिकनगुनिया |
|---|---|---|

ही कशाची नावे आहेत? त्यासमोरील चौकटीत बरोबर (✓) ची खूण करा.

- औषधांची ☐
- डासांची ☐
- रोगांची ☐

2. खाली काही चित्रे दिलेली आहेत. त्यातील कोणकोणत्या ठिकाणी डास अंडी देऊ शकतात? दिलेल्या रकान्यात (✓) ची खूण करा.



☐ कुंड्या




☐ कुलर



तुटलेले टायर



बंद भांडी



चप्पल



पाण्याने भरलेले जोडे



रिकामा माठ



झोपाळे

# आहार

शरीर स्वास्थ्यासाठी संतुलित आहार आवश्यक आहे. संतुलित आहार म्हणजे शरीरासाठी आवश्यक अशा आहारातील बाबी होय. ऋतूनुसार उपलब्ध होणारी फळे आणि भाज्या खाल्ल्याने शरीर निरोगी राहते. गाजर, टोमॅटो, वांगी इत्यादी वेगवेगळ्या रंगांच्या भाज्यांचा खाण्यात समावेश करणे आरोग्यासाठी उत्तम व लाभदायी असते.

खाली तीन रकाने दिले आहेत. पहिल्या रकान्यात ऋतूंची (उन्हाळा, पावसाळा, हिवाळा) नावे दिलेली आहेत. त्यानंतरच्या रकान्यात त्या त्या ऋतूत मिळणाऱ्या भाज्या व फळे यांची नावे दिलेली आहेत. त्या पुढचा रकाना रिकामा ठेवण्यात आलेला आहे. त्यात तुम्ही ऋतूप्रमाणे फळांची व भाज्यांची नावे लिहा, ज्यांचा तुम्ही आहारात समावेश करता.

| ऋतू | भाजी, अन्न आणि फळे | तुम्ही आहारात घेत असलेल्या भाज्या व फळे |
|---|---|---|
| उन्हाळा | काकडी, टरबूज, खरबूज, आंबा, द्राक्षे | |
| पावसाळा | भुईमूग, बाजरी, ज्वारी, मका, मूग, केळी | |
| हिवाळा | हरभरा, गहू, वाटाणा, मुळा | |

पावसाळ्यात भुईमुगाच्या कच्च्या शेंगा आणि हिवाळ्यात गव्हाच्या ओंब्या, हिरवा हरभरा भाजून खाण्याची मजा काही औरच असते.

आहारासंदर्भात काही घरगुती खाण्यापिण्याच्या पद्धती आहेत, ज्यांचा अवलंब आपण केला पाहिजे.

- पालेभाज्या कापण्यापूर्वी धुवाव्यात, कापल्यानंतर धुतल्याने त्यांतील पोषकतत्त्वे कमी होतात.
- गूळ व शेंगदाणे एकत्र करून गुळपट्टी तयार केली जाते .
- तीळ व गूळ एकत्र करून तिळाचे लाडू करून खाता येतात. हिवाळ्यात हे लाडू खाणे स्वास्थ्यासाठी लाभदायी असते .
- मटकी, हरभरे, मूग यासारखी मोड आलेली कडधान्ये खाणे आरोग्यासाठी लाभदायी ठरते.
- पीठ आंबवले, की त्यातील पोषकतत्त्वे वाढतात.

## वाचा आणि अक्षर लिहा.

उ




आज रोख उद्या उधार



उखळ




उशी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उघडणे | उडणे | उफणणे | उचकी | उपचार |
| उतरणे | उकडणे | उतरंड | उदास | उणीव |

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



उसळ



उंट



उंदीर



उखळ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना शब्द वाचताना मदत करावी, त्यांचेकडून अक्षर लिहून घ्यावे.
- दिलेल्या जागी चित्राचे नाव लिहून घ्यावे.

## वाचा आणि अक्षर लिहा.

ऊ



ऊस



पाऊल



पाऊस

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाऊ | खाऊ | ऊत | ऊर | ऊर्ध्व |
| मऊ | ऊर्जा | ऊर्जिता | नऊ | ऊठ |
| ऊर्फ | ऊद | ऊब | ऊन | ऊर्मी |

ऊ ऊ ऊ

ऊ ऊ ऊ

## ▪ चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



ऊस



नऊ



चिऊ



खाऊ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून 'कधी कडक ऊन' या सारखी वाक्ये वारंवार म्हणून घेण्याचा सराव.

## वाचा आणि अक्षर लिहा.

ह




होळीच्या दिवशी निरनिराळे रंग एकमेकांत मिसळून जातात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हरीण | हिरवळ | हिरवा | हुशार | हात |
| हत्ती | हैबत | हौद | हलका | हंस |
| हिरकणी | हंडा | हेरंब | होरपळणे | हवा |
| हलवा | हिमालय | हिमनग | हमाल | हुंगणे |

ह ह ह

ह ह ह

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



हत्ती



हरीण

होडी





हातोडा

## वाचा आणि अक्षर लिहा.

छ



छत्रीवाल्याची छत्री पावसात उडून गेली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| छापा | छत | छाननी | छान | छाप |
| छंद | छनछन | छेद | छिन्नी | छाया |
| छोटा | छत्रपती | छबी | छत्र | छायाचित्र |
| छाती | छापखाना | छडी | छुमछुम | छळ |

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.


छत्री



छपन्न


छत


छावा

## ▪ वाचा आणि अक्षर लिहा.

थ



जिथे रानमेवा तिथे पक्ष्यांचा थवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| थांबणे | थकणे | थाळी | काथ्या | थंडी |
| थंड | थांबा | थेंब | थेट | थयथयाट |
| थरकाप | थडगे | थुंकणे | थाट | थारा |

थ थ थ

थ थ थ

- चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



थेंब



थवा



थैली



थप्पी

## ▪ वाचा आणि अक्षर लिहा.

फ



फरीदा, लवकर खा.

कुल्फी विरघळत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फूल | फुलोरा | फुगणे | फंड | फाल्गुन |
| फळ | फांदी | फौज | फळी | फुटीर |
| फास | फसवणे | फूट | फर्मान | फीत |
| फरशी | फाईल | फाळणी | फुंकर | फणा |

फ फ फ

फ फ फ

- ***चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.***




फणस



फावडे




फळे



फाटक

## वाचा आणि अक्षर लिहा.

ठ



नदीचा काठ सुंदर दिसतो.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठग | ठाऊक | ठणकणे | ठसा | ठेच |
| ठाव | ठोकर | ठराव | ठपका | ठिणगी |
| ठेंगणा | ठुमकत | गाठोडे | काठ | ठणठणाट |
| ठिसूळ | ठसका | ठोस | ठळक | ठप्प |

ठ ठ ठ

ठ ठ ठ

▪ *चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.*

8 आठ



ठसा

60 साठ



ठोकळा

■ दिलेल्या अक्षरांखाली त्या अक्षराने सुरू होणारे शब्द ओळखून लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| छत्री | फळ | डमरू | ठेच | हरीण | छावा |
| फावडे थकवा | डास | थवा ठसा | फवारा | हसणे छगन | फणस |
| ह | छ | थ | फ | ड | ठ |
| हरीण | छत्री | ______ | ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ | ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ | ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ | ______ | ______ | ______ |
| ______ | ______ | ______ | ______ | ______ | ______ |

■ दिलेल्या शब्दातील जोडाक्षरे ओळखून त्याच जोडाक्षराचा शब्द रिकाम्या जागेत लिहा.

| मठ्ठा | गट्टी | पिस्ता | लज्जा | पक्का | ज्वाला | गुप्ते |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ज्वारी | ज्वा | जसे | ज्वाला |
| गठ्ठा | ठ्ठा | | ______ |
| मज्जाव | ज्जा | | ______ |
| पट्टी | ट्टी | | ______ |
| हप्ते | प्ते | | ______ |
| रस्ता | स्ता | | ______ |

- काही वर्ण असे असतात, ज्यांची उभी रेषा हटविली की ते अर्धे अक्षर होते, जसे –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| च | च् | – | बच्चा | सच्चा | कच्चा |
| न | न् | – | न्याय | धन्य | कन्या |
| प | प् | – | प्यावे | प्याऊ | प्याला |
| म | म् | – | म्यान | आम्हाला | अचम्बा |
| ल | ल् | – | खाल्ली | दिल्ली | गल्ली |

- क आणि फ या वर्णांचे अर्धाक्षर करण्यासाठी त्यांचा अर्धा आकार कमी केला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | क् | – | क्वचित | पक्का | क्लेश |
| फ | फ् | – | फ्लू | कोफ्ता | फ्लॉवरपॉट |

- काही वर्णांना अर्धे बनवण्यासाठी हलंत ( ् ) लावले जाते, जसे –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ट | ट् | – | चट्टा | गट्टी | भट्टी |
| द | द् | – | मुद्दाम | मुद्दल | मुद्दा |
| ड | ड् | – | अड्डा | गड्डा | खड्डा |

- र ची अन्य रूपे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (र्‍) | र्म | – | कर्म | वर्ष | कार्य |
| (्र) | ट्र | – | ट्रक | राष्ट्र | महाराष्ट्र |
| (्र) | क्र | – | क्रम | प्राण | भ्रम |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- स्वररहित अक्षरासंदर्भात सहभागींसोबत अर्धा शब्द लिहिणे म्हणजे काय यावर चर्चा करा. र जोडण्याच्या पद्धती (र्‍ ्र ्र) व ज्यांचा उच्चार वेगळ्या प्रकारे केला जातो, त्यांची ओळख करून द्या.

- **टीप :** सहभागींना सांगूया वर काही शब्द इंग्रजी उच्चारातील आहेत.

## माझे शब्द


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- आहार व शरीरस्वास्थ्य या विषयावर संवाद साधा.
- सहभागींना विचारून, या विषयासंदर्भात 3-4 शब्द लिहा, हे शब्द सहभागींच्या बोलीभाषेतीलही असू शकतात.
  जसे – हॅण्डपंपसाठी हातपंप इत्यादी.
- आतापर्यंत शिकलेल्या शब्दांचे व संख्यांचे लेखन करण्यास सांगा.

## ■ कचऱ्याचा जीवनकाळ

आपण जो कचरा फेकतो, तो किती काळपर्यंत नष्ट होत नाही. समजून घेऊया –

**कचऱ्याचा जीवनकाळ**




लवकर नष्ट न होणारा हा कचरा, आपल्या घरातून व गल्लीबोळातून उचलून तर नेला जातो, पण या चित्रातून आंम्हाला हे कळून येते, की कचरा भलेही डोळ्यांसमोरून हटवला जातो, मात्र निसर्गाला नुकसान पोहोचवत राहतो. यावर एकच उपाय आहे, तो म्हणजे आपण कमीत कमी कचरा करण्याचा प्रयत्न करावा.

**सांगा आता –**

प्रश्न 1. कोणकोणत्या वस्तू 50 वर्षांपेक्षा कमी काळात नष्ट होतात?


प्रश्न 2. कोणकोणत्या वस्तू कधीच नष्ट होत नाहीत?

प्रश्न 3. कोणकोणत्या वस्तू नष्ट व्हायला सर्वांत कमी कालावधी लागतो?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींसोबत निसर्गाला हानी पोहोचवणाऱ्या बाबींसदर्भात चर्चा करा.
- कचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी या संदर्भात त्यांची मते जाणून घ्या.

■ विद्यालयात स्वातंत्र्यदिनाच्या समारंभाच्यावेळी मुलांना लाडूचे डबे वाटण्यात आले. एका डब्यात चार लाडू असतील, तर चला माहीत करून घेऊ, की जर दहा मुलांना लाडूचे डबे वाटायचे असतील, तर एकूण किती लाडू असायला हवेत?


एका मुलाला  मिळतील अर्थात 1 डबा 4 लाडूंचा

1 वेळा 4

1 गुणिले 4

किंवा 1 × 4 = 4 लाडू

---

2 मुलांना मिळतील  अर्थात 2 डबे 4 लाडूंचे


4 + 4

2 वेळा 4

2 गुणिले 4

किंवा 2 × 4 = 8 लाडू

---

3 मुलांना मिळतील  अर्थात 3 डबे 4 लाडूंचे


4 + 4 + 4

3 वेळा 4

3 गुणिले 4

किंवा 3 × 4 = 12 लाडू

---


4 मुलांना मिळतील  अर्थात 4 डबे 4 लाडूंचे

4 + 4 + 4 + 4

4 वेळा 4

किंवा 4 गुणिले 4 = 4 × 4 = 16 लाडू

---

5 मुलांना मिळतील  अर्थात 5 डबे 4 लाडूंचे

4 + 4 + 4 + 4 + 4

5 वेळा 4

किंवा 5 गुणिले 4 = 5 × 4 = 20 लाडू

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- एखाद्या संख्येची वारंवार बेरीज करण्याच्या क्रियेस गुणाकार असे म्हणतात. सहभागींना वेगवेगळ्या संदर्भाने (जसे – खुर्चीच्या पायांची संख्या), गुणाकाराची क्रिया समजून घेण्यास मदत करा. संख्यांची गुणाकाराच्या स्वरूपात मांडणी करण्यास व लिहिण्यास प्रेरित करा.

7 मुलांना किती लाडू मिळतील ते सांगा?

4 + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐ वेळा ☐

किंवा ☐ गुणिले ☐ = ☐ × ☐ = ☐

10 मुलांना किती लाडू मिळतील ते सांगा?

4 + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ + ☐ = ☐ वेळा ☐ = ☐ गुणिले ☐ = ☐ लाडू

गल्लीबोळातून उचललेल्या कचऱ्याचा पुनर्वापर करणे शक्य आहे.
जसे – प्लॅस्टिक, काच, कागद. यात भंगारवाल्याची मुख्य भूमिका असते.
संजयने घराची साफसफाई केली आणि साफसफाई नंतर निघालेले भंगार सामान भंगारवाल्याला विकले. भंगारवाल्याचे दरपत्रक पाहून सांगा –

| वस्तू | मूल्य (प्रति किलोग्रॅम) |
|---|---|
| वर्तमानपत्र | ₹ 10 |
| प्लॅस्टिक | ₹ 8 |
| लोखंड | ₹ 20 |
| वह्या/पुस्तके | ₹ 8 |
| पुठ्ठे/पुठ्ठ्याचे डबे | ₹ 5 |
| काच | ₹ 4 |

- 8 किलोग्रॅम प्लॅस्टिक विकल्यावर किती रुपये मिळतील?
- 7 किलोग्रॅम वर्तमानपत्रे विकल्यावर किती रुपये मिळतील?
  भंगारवाल्याच्या दरपत्रकात सर्वांत कमी मूल्य असलेली वस्तू कोणती?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**
- सहभागींना वेगवेगळ्या संदर्भाने वस्तू विकत घेणे व विकणे या बाबी केल्यावर हिशेब करणे व त्यासंदर्भाने गुणाकार करणे, लिहून ठेवणे या बाबींसाठी प्रेरित करा.


प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर कमी करण्यासाठी, भिवापूर गावातील गावकऱ्यांनी एकत्रितपणे निर्णय घेतला, की सामान आणण्यासाठी ते कापडी पिशवीचाच वापर करतील. गावात पिशव्या वाटण्यासाठी त्यांनी 100 पिशव्यांचे एक याप्रमाणे बंडले तयार केली.

चला, पिशव्या मोजूया!

1 बंडल 100 पिशव्यांचे  किंवा 1 वेळा 100 किंवा $1 \times 100 = 100$ पिशव्या

2 बंडले 100 पिशव्यांची  किंवा 2 वेळा 100 किंवा $2 \times 100 = 200$ पिशव्या

3 बंडले 100 पिशव्यांची  किंवा 3 वेळा 100 किंवा $3 \times 100 = 300$ पिशव्या



$4 \times 100 = 400$ पिशव्या

$5 \times 100 = 500$ पिशव्या

$6 \times 100 = 600$ पिशव्या

$7 \times 100 = 700$ पिशव्या

$8 \times 100 = 800$ पिशव्या

$9 \times 100 = 900$ पिशव्या

$10 \times 100 = 1000$ पिशव्या

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना शंभरपेक्षा मोठ्या संख्यांचा परिचय करून द्या.
- संख्या स्थानिक किमतीनुसार शतक, दशक आणि एकक अशा स्वरूपात लिहिण्यास प्रेरित करा.
- सोबतच एक हजार पर्यंतच्या संख्यांचा अभ्यास करतानाच, पुढे 5 हजार पर्यंतच्या संख्यांचा गुणाकाराच्या स्वरूपात परिचय करून द्या.

## ▪ मिळून वाचा

# गांधीजींच्या आश्रमात

काही वर्षे गांधीजींनी आश्रमात भांडार सांभाळण्यास मदत केली. सकाळच्या प्रार्थनेनंतर ते स्वयंपाकघरात जाऊन भाज्या स्वच्छ करायचे. स्वयंपाकघरात अस्वच्छता किंवा जाळी लागलेली आढळली, तर ते आपल्या सोबत्यांना चांगले खडसवायचे. त्यांना भाज्या, फळे आणि धान्यातील पौष्टिक गुणांचे ज्ञान होते. एकदा आश्रमात राहणाऱ्या एका व्यक्तीने न धुता बटाटे कापले. गांधीजींनी त्याला बटाटे, लिंबे न धुता कापू नये असे समजावून सांगितले.



गांधीजींच्या आश्रमातील एका माणसाला काळे ठिपके पडलेली केळी दिली गेली. त्याचे त्याला फार वाईट वाटले. तेव्हा गांधीजींनी त्याला समजावून सांगितले, की ही लवकर पचतात आणि तुम्हांला यासाठी ती दिली, कारण तुमची पचनशक्ती कमजोर आहे. गांधींजी आश्रमातील लोकांना स्वतः जेवण वाढायचे, त्यामुळे आश्रमवासी बिचारे बेचव, उकडलेल्या पदार्थांविरुद्ध काही बोलूही शकत नव्हते. दक्षिण आफ्रिकेला त्यांनी एका तुरुंगात शेकडो कैद्यांना दिवसातून दोन वेळा जेवण वाढण्याचे काम केले होते.

आश्रमात एक नियम हाही होता, की प्रत्येकाने आपली भांडी स्वतः स्वच्छ करायची. स्वयंपाकाची भांडी काही लोक गट तयार करून आळीपाळीने स्वच्छ करायचे. एक दिवस गांधीजींनी मोठी भांडी स्वच्छ करण्याचे काम स्वतःकडे घेतले. भांडी जोवर चमकत नाहीत, तोपर्यंत त्यांचे समाधान होत नव्हते. एकदा जेलमध्ये त्यांना जो साहाय्यक दिला होता, त्याचे काम पसंत न पडल्याने त्यांनी लोखंडी भांडीही घासून कशी चांदीसारखी चकचकीत करता येतात हे स्वतः दाखवून दिले.



*स्रोत : वसंत, कक्षा–6, एनसीईआरटी*


## टिपण


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शिकलेल्या शब्दांचे लेखन करण्यास सांगा.
- बेरीजेची उदाहरणे सोडवण्याचा सराव घ्या.

## *संवादासाठी :*

1) तुम्ही कधी मतदान केले आहे का?
2) तुम्ही कधी निवडणुकीला उभे राहिले आहात का?
3) मतदान करणे आणि निवडणुकीला उभे राहणे यात काही फरक आहे का?
4) वयाच्या कोणत्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळतो?
5) तुम्हांला मतदान करताना कधी कोणती अडचण आली का?




शाळा
5

# 6. मतदान

**आपण शिकूया!**

| क्ष | घ | ध | ढ | ळ |
|---|---|---|---|---|

- तीन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी.
- गुणाकाराची उकल समजून घेणे.
- लांबीची एकके (सेंटीमीटर, मीटर)

## चित्रावरून अंदाज बांधा व वाचा




मतदान केंद्र



मतदान कक्ष



ईव्हीएम मशीन



निवडणूक अधिकारी



उमेदवार



ओळखपत्र




नमूना मतपत्रिका



मतदान केल्याचा पुरावा म्हणून लावलेली शाई

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींकडून क्रमाक्रमाने सर्व चित्रांची ओळख करून घ्या.
- चित्राखाली त्याच्याशी संबंधित शब्द दिलेले आहेत. सहभागींना दिलेले शब्द वाचायला सांगा.

## वाचा आणि अक्षर लिहा.

घ




वेळ पाहण्यासाठी **घ**ड्याळाचा उपयोग करतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| घासणे | घाम | घर | घाट | घोडा |
| वाघीण | वाघ | घाण | घाव | घाई |
| घेराव | घागर | घरटे | घाणा | घूस |
| घेतला | घुमट | घोषणा | घट | घुबड |


घ घ घ

घ घ घ

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



घंटा



घोडा



घरटे



घर

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्द वाचताना सहभागींना मदत करा आणि त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या. तसेच दिलेल्या जागी चित्रांची नावे लिहून घ्या.

## ▪ वाचा आणि अक्षर लिहा.

ध



बाई मी **ध**रण, **ध**रण बांधिते
माझं मरण मरण कांडिते

*– दया पवार*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| धक्का | धडकणे | दूध | धावा | धागा |
| धरा | धबधबा | धुरळा | वध | धीरज |
| धोबी | धुणे | धीर | धिंगाणा | धोरण |
| धोका | धैर्य | धूर | धावपट्टू | धुंद |

ध ध ध

ध ध ध

## ▪ चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



धबधबा

AADHAAR
आधार



धरण



धागा

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्द वाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या, तसेच दिलेल्या जागी चित्राचे नाव लिहून घ्या.

■ वाचा आणि अक्षर लिहा.

ढ



ढगा ढगा पाऊस पाड,
ढगा ढगा पाऊस दे !

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ढोल | ढीग | ढकल | ढगळ | ढेकर |
| ढेकूण | ढेरी | ढिला | ढोंग | ढिगारा |
| कढई | गाढव | ढगाळ | ढाल | ढंग |
| ढोबळ | ढग | ढोर | ढोकळा | काढा |


ढ ढ ढ

ढ ढ ढ

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.




ढाबा



ढोल



ढाल



ढग

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्दवाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या, तसेच दिलेल्या जागी चित्राचे नाव लिहून घ्या.

## वाचा आणि अक्षर लिहा.

ळ



बाळाचे पाय पाळण्यात दिसतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चाळ | फळ | मळ | कावळा | मावळा |
| कोळी | राळ | चाळणी | वाळू | बाळू |
| नाळ | मळी | फळी | काळोख | कळप |
| मळे | कळी | शाळा | ढोकळा | खेळू |


ळ ळ ळ

ळ ळ ळ

## चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.



नळ



नारळ



माळ



टाळ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शब्द वाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या, तसेच दिलेल्या जागी चित्राचे नाव लिहून घ्या.

## ▪ वाचा आणि अक्षर लिहा.



क्ष


मुलांना राक्षसाच्या गोष्टी आवडतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्षमा | कक्ष | शिक्षा | परीक्षा | राक्षस | क्षण |
| शिक्षित | कुरुक्षेत्र | पक्ष | दीक्षाभूमी | पक्षी | क्षेत्र |
| दीक्षा | साक्षी | नक्षी | दक्ष | अक्ष | क्षेत्रफळ |
| साक्षर | क्षत्रिय | निरक्षर | साक्ष | अक्षर | क्षितिज |

क्ष

क्ष


- *चित्र पाहा, शब्द वाचा व लिहा.*



शिक्षिका



बक्षीस



पक्षी



क्षत्रिय

# आपण एक मतदाता आहात.

- आपले नाव मतदार यादीत समाविष्ट होऊ शकते, जर आपण –



भारतीय नागरिक आहात.



मतदान क्षेत्रातील रहिवासी आहात.



आपले वय त्या वर्षाच्या १ जानेवारीला १८ वर्षे पूर्ण झालेले आहे.



मतदान यादीमध्ये नाव सामाविष्ट करण्यासाठी अर्ज केला आहे.

**NOTA – जर आपल्याला एकाही उमेदवाराला मत द्यायचे नसेल तर NOTA हे बटण दाबा!**

**प्रश्न 1. तुमच्याजवळ निवडणूक ओळखपत्र आहे का?**

**प्रश्न 2. आपल्या मतदान क्षेत्राचे नाव काय आहे?**

**प्रश्न 3. मतदान करण्यासाठी आपल्याजवळ काय काय असावे लागते?**

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- मतदानाशी निगडित सर्व बाबी वर दिलेल्या आहेत. सहभागींना वाचायला सांगा व आवश्यक तिथे मदत करा.
- हा घटक शिकवण्यापूर्वी असाक्षरांना मतदान ओळखपत्र घेऊन येण्यास सांगणे.

■ मतदान ओळखपत्र पाहा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा –


भारतीय निवडणूक आयोग
ELECTION COMMISSION OF INDIA
इलेक्ट्रॉनिक फोटो ओळखपत्र - ELECTOR PHOTO IDENTITY CARD
SFXXXXXXXX

नाव : XXXXX XXXXXX
Name : XXXXX XXXXXX
वडीलांचे नाव : XXXX XXXXXX
Father's Name : XXXX XXXXXX

लिंग / Sex : XXX XXXX
जन्मतारीख / वय : XXX XXXX
Date Of Birth/Age : XXX XXXX
जिल्हा : XXXX, XXXXXXXX
Address : XXXX, XXXXXXXX XXX XXXX
XXXX, XXXXXXXX XXX XXXX
XXXX, XXXXXXXX XXX XXXX

निवडणूक नोंदणी अधिकारी यांनी स्कॅन केलेली स्वाक्षरी
Scanned Signature Electoral Registration Officer

तारीख / Date : XXX XXXX
विधानसभा निर्वाचित क्षेत्र संख्या आणि नाव : XXX XXXX
Assembly Constituency No. & Name : XXX XXXX
भाग संख्या आणि नाव : XXX XXXX
Part No and Name : XXX XXXX

टीप/Note :
1. या कार्डचा फक्त ताबा आपण आहात याची शाश्वती नाही विद्यमान मतदारयादीचा मतदार कृपया आपले नाव तपासा प्रत्येक निवडणुकीपूर्वींच्या मतदार यादीमध्ये.
Mere possession of this card is no guarantee that you are elector of the current electoral roll. Please check your name in the current electoral rolls before every election.
2. या कार्डमध्ये नमूद केलेली जन्मतारीख एक म्हणून मानली जाणार नाही याशिवाय इतर कोणत्याही हेतूसाठी वयाचा किंवा जन्मतारीखचा पुरावा मतदार याद्यांमध्ये नोंदणी.
Date of birth mentioned in this card shall not be treated as a proof of age or date of birth for any purpose other than registration in electoral rolls.

■ प्रश्न 1. मतदान कार्डात दिलेली माहिती कोणत्या भाषेत आहे?

---

■ प्रश्न 2. आपले मतदान कार्ड कोणत्या भाषेमध्ये आहे?

---

■ प्रश्न 3. मतदान कार्डात आपल्या विवाहाबद्दलची माहिती दिलेली आहे का?

---

■ प्रश्न 4. मतदान ओळखपत्रात मतदाराची कोणकोणती माहिती दिली आहे?

---

**प्रश्न 6. मतदान कार्ड पाहून त्यात दिलेल्या माहितीची यादी करा –**

| अ.क्र. | माहिती |
|---|---|
| 1. | मतदाराचे नाव |
| 2. | |
| 3. | लिंग |
| 4. | |
| 5. | |
| 6. | |
| 7. | |
| 8. | |

मतदार ओळखपत्र, भारतातील सर्व नागरिक ज्यांचे वय 18 किंवा 18 पेक्षा अधिक आहे अशा सर्वांना दिले जाते. ओळखपत्र भारत निवडणूक आयोगाद्वारा दिले जाते.

**चर्चा करा –**

- मतदान करणे आवश्यक का आहे?
- लोकशाही कशाला म्हणतात?
- आपण मतदान केव्हा करता?
- मतदान करण्यापूर्वी आपण काय विचार करता आणि का?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींशी मतदान व त्याच्याशी निगडित बाबींवर चर्चा करा. मतदानाच्या अधिकाराची वैशिष्ट्ये व त्याच्या योग्य वापरावर भर द्या.

## मतदानाची तयारी




मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाते. त्यामुळे आपल्याला कामावर जाण्यासाठी धावाधाव करावी लागत नाही.

आपले नाव मतदार यादीत पाहून घ्या. आपण निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरही पाहू शकता.





घरून निघताना आपले मतदान ओळखपत्र (वोटर कार्ड) सोबत घेऊन जायला विसरू नका. परंतु मोबाईल, कॅमेरा इत्यादी सोबत घेऊन जाऊ नका. मतदानकेंद्रात या वस्तू घेऊन जाण्याची परवानगी नाही.






मतदानकेंद्राबाहेर रांगेत उभे राहा. जर एखाद्यास रांगेत उभे राहणे शक्य नसेल, तर त्याला आधी मतदान करू द्यावे.

स्रोत - http://ecisveep.nic.in/gallery/image/1349-general-voters-guide/ ?context=new

■ लक्षपूर्वक पाहा, वाचा आणि आपसात चर्चा करा.










## ■ *माझे शब्द*

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- मतदान या विषयावर संभाषण करा. सहभागींना विचारून या विषयाशी संबंधित जास्तीत जास्त शब्द लिहा. हे शब्द त्यांच्या स्वत:च्या भाषेतील असू शकतात. जसे– 'मतदान' साठी 'वोट देणे' इत्यादी.

निवडणुकीत मतदानानंतर मतांची मोजणी केली जाते, ज्याला मतमोजणी असे म्हणतात. ज्याला सर्वांत जास्त मते मिळतात त्याला विजयी घोषित केले जाते.




उमेद्‌वारांना पुढीलप्रमाणे मते मिळाली आहेत.

| | |
|---|---|
| लक्ष्मी | – 200 मते |
| विजय | – 124 मते |
| आशा | – 170 मते |
| NOTA | – 6 मते |
| टाकण्यात आलेली एकूण मते | – 500 मते |

वरील सूचना समजून घेऊन प्रश्नांची उत्तरे द्या.

1. सर्वांत जास्त मते कोणाला मिळाली?
2. सर्वांत कमी मते कोणाला मिळाली?
3. निवडणुकीत दुसऱ्या स्थानावर कोण आहे?
4. निवडणुकीत एकूण किती उमेदवार आहेत?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना प्रोत्साहित करा; जेणेकरून ते वेगवेगळ्या संदर्भाने तीन अंकी संख्यांमध्ये तुलना करू शकतील, तसेच बेरीज–वजाबाकीच्या विविध पद्धती शोधून, दिल्या गेलेल्या माहितीच्या आधारे निर्णय घेऊ शकतील.

■ मापन

**लक्षात ठेवा**

**1 सेमी = 10 मिमी**

**100 सेमी = 1 मीटर**

**1000 मी = 1 किमी**




650 मीटर　670 मीटर　720 मीटर　750 मीटर　800 मीटर

## ■ मुलींच्या धावण्याच्या स्पर्धेत कोण जिंकेल?

**वरील चित्राच्याआधारे खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.**

1. धावण्याच्या शर्यतीत सर्वात मागे कोण आहे?
2. आणखी किती मीटर धावल्यानंतर प्रियंका जिंकू शकते?
3. रूपा झेलमपेक्षा किती मागे आहे?
4. कमला प्रियंकापेक्षा किती मागे आहे?


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- जास्त अंतर मोजण्यासाठी किलोमीटरचा वापर केला जातो. कमी अंतर मोजण्यासाठी मीटर, तसेच खूपच कमी अंतर मोजण्यासाठी सेंटीमीटरचा उपयोग करतात. किलोमीटरला किमी, मीटरला मी. तसेच सेंटीमीटरला सेमी असे लिहितात. खूपच कमी लांबी मोजण्यासाठी मिलिमीटरचा वापर करतात. त्याला मिमी असे लिहितात. या मापनांची ओळख सहभागींना करून द्या.

- मापनासाठी वेगवेगळी मापन साधने असतात.

1 सेंटीमीटर



- मोजा आणि रिकाम्या जागी माप लिहा.

- नख ______ सेमी
- पेन्सिल ______ सेमी
- मोबाईल फोन ______ सेमी
- भिंतीवर अशा दोन रेषा ओढा, की ज्यांच्यातील अंतर 1 मीटर आहे.

- विचार करा व रिकाम्या जागा भरा.

- दोन शहरांतील अंतर आपण ______________ मध्ये मोजतो.
- नखाची रुंदी ______________ मध्ये मोजली जाते.

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना आजूबाजूच्या वस्तूंच्या लांबीचा अंदाज बांधायला लावा. तसेच प्रत्यक्ष मोजून खात्री करून घेण्याची संधी द्या. वारंवार अंदाज बांधले, की अंदाज बांधण्यात अचूकता येऊ लागते.

# 7. कायदेविषयक माहिती

**आपण शिकूया!**

| त्र | श्र | ण | ऋ | ज्ञ |
|---|---|---|---|---|

- दैनंदिन जीवनात उपयोगात येणाऱ्या विचारांची समज येणे.
- भाग ही संकल्पना समजून घेणे.
- वजनाचे मोजमाप करणे. (ग्रॅम आणि किलोग्रॅम)

## पाहा आणि वाचा.




पोलीस स्टेशन



न्यायालय



कायदा



वकील



नोटरी



कोर्ट




कौटुंबिक न्यायालय




एफआयआर

- खाली दिलेले कायद्याशी संबंधित शब्द वाचा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| न्याय | खटला | अपील | कलम |
| अर्ज | साक्षीदार | फौजदारी | वकील |
| कैद | तारीख | अपराधी | न्यायालय |
| अटक | गुन्हेगार | न्यायाधीश | जामीन |
| कोठडी | जप्त | दैनंदिनी | याचिका |
| चौकशी | दोषी | तक्रारकर्ता | स्थगिती |
| गस्त | पोलीस ठाणे | तक्रार | गुन्हा |

■ *वाचा व अक्षर लिहा .*

त्र



चित्रा आपल्या आत्याला पत्र लिहीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पत्र | सर्वत्र | सत्र | त्रयोदशी | नेत्रदान |
| मित्र | त्रुटी | त्रिज्या | त्राण | चित्र |
| यात्रा | त्रिशूळ | विचित्र | एकत्र | दानपात्र |


## चित्र पाहा व शब्द लिहा.




मित्र




पत्र



कुत्रा




त्रिकोण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करू या!**

- शब्दवाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या, तसेच दिलेल्या जागी चित्रांचे नाव लिहून घ्या.

# साक्षरता सूत्र

गावावरून येता कुठे कुणा,
सुख-दु:खाच्या संदेशाचे पत्र!
नको गड्यांनो आजूबाजूला,
अंधकारमय अज्ञानाचे सत्र!
आजी आजोबा ओळखायचे,
फक्त पुस्तकातले चित्र!
पत्र चांगले वाचणारा,
कोणी मिळेल का मित्र!
अज्ञानामुळे ओढवते,
परिस्थिती अशी विचित्र!
अज्ञान अंधकार मिटवू,
ज्ञानासारखा नसे दुजा सन्मित्र!
वाडीवस्ती घरीदारी,
नवभारत साक्षरतेचे सूत्र!
गावोगावी करू सारे,
साक्षर माता, पिता, लेक, पुत्र!
हातात गुंफून हात,
सारे येऊया एकत्र!
अक्षर, अंकाची पायाभूत ओळख,
साक्षर पिढी घडवू सर्वत्र!



*श्री. जयप्रकाश पाटील*

## शब्द पाहा, शब्द वाचा व लिहा.

श्र



श्रीखंड



श्रवणयंत्र



आश्रम



श्रावणबाळ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आश्रम | श्रीमंत | परिश्रम | श्रद्धा | श्रावण | श्रम | श्रोता |
| श्रवणेंद्रिय | श्रीखंड | श्रेणी | श्रेय | श्रेष्ठ | श्रुतिका | श्राव्य |

श्र श्र श्र

श्र श्र श्र

## वाचा आणि अक्षर लिहा.

ण




निवडणुकीपूर्वी, नेत्यांची खूप भाषणे झाली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| परिणाम | बाण | त्रिकोण | रणवीर | अर्पण | रावण |
| गणना | पुणे | गुणाकार | पौर्णिमा | गणित | आरक्षण |
| प्राण | लक्षण | गुण | पूर्ण | पणजी | प्राणी |


प प प

प प प

## चित्र पाहा व शब्द लिहा.



त्रिकोण



बाण



पौर्णिमा

## वाचा व अक्षर लिहा.

ऋ





**आपण आपल्या शिक्षकांचे नेहमी ऋणी राहू.**

| | | | |
|---|---|---|---|
| ऋषभ | ऋग्वेदी | ऋचा | ऋणाईत |
| ऋषी | ऋतू | ऋण | ऋतुचक्र |
| ऋग्वेद | ऋणनिर्देश | ऋषिपंचमी | ऋत्विजा |
| वृक्ष | नृत्य | मृग | कृषक |
| कृपा | गृह | मृत्यू | प्रकृती |

ऋ ऋ ऋ

ऋ ऋ ऋ

## ▪ चित्र पाहा व शब्द लिहा.



ऋषी




ऋतुचक्र

ऋषिकेश



## वाचा व अक्षर लिहा.

# ज्ञ



संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला.

| | | | |
|---|---|---|---|
| ज्ञानी | ज्ञान | अज्ञात | अज्ञान |
| विज्ञान | प्रज्ञा | सज्ञान | ज्ञाता |
| आज्ञा | तंत्रज्ञान | यज्ञ | |

ज्ञ ज्ञ ज्ञ

ज्ञ ज्ञ ज्ञ

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करू या!**

- शब्दवाचनासाठी सहभागींना मदत करा.
- त्यांच्याकडून अक्षर लिहून घ्या, तसेच अक्षरांचा सराव करून घ्या.

# ज्ञानवाटा



तिमिर रात्र हटवू,
देऊ अज्ञानाला फाटा!
साजरा करू ज्ञानोत्सव,
निर्माण करण्या ज्ञानवाटा!
लेखन वाचन गणन,
शुन्यावर आणू असाक्षर अज्ञानी!
गांवोगावी प्रेरित स्वयंसेवक
नवपिढी घडवू सारी सज्ञानी!
तनामनात रूजवू,
लहानथोरांमध्ये साक्षरतेची संज्ञा!
उजास सत्वर मिरवू,
असाक्षरांची करू साक्षर प्रज्ञा!
शाळां शाळांमधून चालवू,
साक्षरतेचा अविरत ज्ञान यज्ञ!
आरोग्य, आर्थिक, डिजिटलचे,
देऊनी ज्ञान, करू अवघे सुज्ञ!
मनामनात तेजवू
संख्या, अक्षर ज्ञानाचे दिवे!
कडेकपारीत ज्ञान किरणे,
घेतील भरारी ज्ञानाचे थवे!
गांव शहरी, गल्लोगल्ली,
प्रवाहित होता ज्ञान गंगा!
डौलाने विश्वात फडकेल,
शतप्रतिशत ज्ञान साक्षर तिरंगा!



*श्री. जयप्रकाश पाटील*

# मदत मिळणार कशी ?

रखमाची स्थिती फारच वाईट आहे. तिचा मुलगा श्रवण याला पोलिसांनी पकडले आहे. त्यांचे म्हणणे आहे, की दुकानाला त्यानेच आग लावली आहे.

बबनच्या दुकानात काल रात्री आग लागली होती. दुकानातील बरेचसे सामान जळून खाक झाले होते. अजूनपर्यंत आग कशी लागली याचा पत्ता लागलेला नाही आणि पोलिसांनी श्रवणला कैद केले.

श्रवणला पोलिसांनी पकडल्याची बातमी इकडे तिकडे पसरली. रखमाच्या लक्षात येत नव्हते, की श्रवणला कसे सोडवावे ? तिच्याजवळ तर एकही पैसा नव्हता.





आजूबाजूचे लोकही तिच्यासारखेच गरीब होते. शेवटी एक आशेचा किरण दिसला. रखमाला मीनाताईंची आठवण झाली. त्यांनी रखमाला मार्ग सुचवला. त्या रखमाला मोफत कायदा सहायता केंद्रात घेऊन गेल्या. मोफत कायदेविषयक सहायता केंद्रे, तालुका, जिल्हा, राज्य तसेच केंद्र स्तरावर स्थापन झालेली असतात. तेथे गरिबांना वकिलाची सेवा मोफत मिळते. आवश्यक कागदपत्रांसाठी फी सुद्धा द्यावी लागत नाही.

रखमाने त्यांच्या मदतीने सहायता अधिकाऱ्यांस अर्ज केला. अधिकाऱ्यांनी तिला कायदेविषयक मदत करण्याचे आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी श्रवणला न्यायालयापुढे आणले गेले. मोफत सहायता केंद्राच्या वकिलांनी जामीनाचे कागदपत्र जमा केले. न्यायाधीश साहेबांनी विचारपूस करून जामीन मंजूर केला. श्रवणला जामिनावर सोडण्यात आले. त्यानंतर खटला चालू राहिला. रखमाला मोफत कायदा सहायता केंद्रातून वेळोवेळी मदत मिळत गेली. त्यामुळे रखमाला वकिलाची फी ही द्यावी लागली नाही आणि कागदपत्रांचा खर्चही करावा लागला नाही. श्रवणच्या विरुद्ध कोणताच पुरावा सापडला नाही, त्यामुळे त्याची न्यायालयाने निर्दोष सुटका केली.

मोफत कायदेविषयक सहायता केंद्राच्या मदतीमुळे श्रवण वाचला. रखमा व श्रवणच्या आनंदाला पारावर राहिला नाही. ते आजही मोफत कायदेविषयक सहायता केंद्र आणि मीनाताईंची स्तुती करतात.

## प्रथम सूचना रिपोर्ट (एफआयआर)

पोलीस एफआयआर लिहून घेतल्यानंतर कोणत्याही अपराधाची विचारपूस सुरू करू शकतात. कायद्यात असे म्हटले आहे की, गुन्ह्याची सूचना मिळाल्यानंतर जवळच्या पोलीस चौकीत लगेच एफआयआर दाखल केला पाहिजे. पोलिसांना ही सूचना मौखिक, लिखित किंवा कोणत्याही रूपात लगेच मिळू शकते. एफआयआर मध्ये साधारण दुर्घटनेची तारीख, वेळ आणि स्थान नमूद केले जाते. त्यात दुर्घटनेचे मूळ कारण आणि घटनेचे विवरण लिहिले जाते. जर गुन्हेगाराची माहिती असेल, तर त्याचे नाव, साक्षीदाराचे नाव देखील त्यात लिहिले जाते. एफआयआर मध्ये गुन्हा दाखल करणाऱ्याचे नाव व पत्ता लिहिलेला असतो. एफआयआर साठी पोलिसांजवळ एक विशेष फॉर्म असतो. त्यावर गुन्हा दाखल करणाऱ्याची स्वाक्षरी घेतली जाते. गुन्हा दाखल करणाऱ्याला पोलिसांकडून एफआयआर ची एक नक्कल प्रत मोफत मिळण्याचा कायदयाने अधिकार असतो.



KARNATAKA STATE POLICE

FIRST INFORMATION REPORT

Under Section 154 Cr.PC

Page 1 of 4

Sl.No.


1. PS MADIVALA — Circle MADIVALA SUB DIVISION — Taluk
   District BANGALORE CITY — Crime No — Date -Mar-2005

2. (i) Section 323,324,341,342,447,506B, — Act INDIAN PENAL CODE, 1860
   (ii) Sections — Act
   (iii) Other Sections and Acts 323,324,341,342,447,506B,

3. (a) Occurrence of Offence — Day WE — Date -Feb-2005 — Time 00:00 PM
   (b) Information received at the PS /03/2005 9:00:00 AM — Written/Oral
   (c) Reasons for delay in reporting to the Complainant/Informant
   (d) General Diary reference Entry No & Time 09:00 AM

4. (a) Place of Occurrence With full address — BANGALORE CITY 560076
   (b) Distance from PS 1.5 KM TO SOUTH WEST
   (c) If the place belongs to another jurisdiction, Name of the PS — District


5. Complainant/Informant
   (a) Name SRI. — Father's/Husband's Name
   (b) Age — Occupation



FORM – IF1 - (Integrated Form)

FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C)

1. Dist. ................ P.S. .................. Year ................ F.I.R. No. ................ Date ............
2. (i) *Act ........................................ *Sections ........................................
   (ii) *Act ........................................ *Sections ........................................
   (iii) *Act ........................................ *Sections ........................................
   (iv) * Other Acts & Sections ........................................
3. (a) * Occurrence of Offence: * Day .................. *Date .................. *Time ................
   (b) Information received at P.S. Date .............................. Time ..............................
   (c) General Diary Reference: Entry No(s) .......................... Time ..............................
4. Type of information : *Written / Oral
5. Place of occurrence: (a) Direction and Distance from P.S. .................... Beat No. ................
   (b) * Address ........................................
   (c) In case outside limit of this Police Station, then the name of P.S. ........................ District ..............................
6. Complainant / information :
   (a) Name ........................................
   (b) Father's / Husband's Name ........................................
   (c) Date / Year of Birth ........................................ (d) Nationality ........................
   (e) Passport No: .................... Date of Issue: .................... Place of Issue ................
   (f) Occupation: ........................................
   (g) Address: ........................................
7. Details of known / suspected / unknown / accused with full particulars (Attach separate sheet if necessary):
8. Reasons for delay in reporting by the complainant / Informant ........................................
9. Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary): ........................



RISHAV TRIVEDI
1403 Sumukh heights
Oshiwara.
8800845817

To.
The senior inspector of Oshiwara
Police station mumbai.

Sub.- Money has been withdrawn from my account.

Sir.
This is to inform you. that today morning 20-12-2019 at 06:45am. 2 transaction happened through my ICICI savings account (113601508256) from some ATM (SACWF735) at Andheri link road. where 20000rs & 16,500rs has been withdrawn. however ATM card was with me in my house and I was still sleeping that time. The moment I saw the message I informed the bank and enquired about the transaction & got the card and account blocked. Can you please get this investigated further and get the CCTV footage of the ATM.

Thanks & Regards
RISHAV TRIVEDI
Rishav

20/10/19
10 new

प्रश्न 1. तुम्ही कधी एफआयआर दाखल केलेला आहे का ?

---

प्रश्न 2. तुमच्या घराजवळ कोणते पोलीस स्टेशन आहे ?

---

प्रश्न 3. गरज पडल्यास तुम्ही कोणत्या फोन नंबरवर पोलिसांची मदत घेऊ शकता ?

---

प्रश्न 4. महिला सुरक्षेसाठी कोणत्या फोन नंबरवर संपर्क करू शकता ?

---

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींबरोबर 'प्रथम सूचना रिपोर्ट' एफआयआर विषयी सविस्तर चर्चा करा
- त्यांना विचारा, की त्यांना कधी एफआयआर दाखल करावा लागला आहे का? आणि का? दिलेल्या प्रतिक्रियांवर चर्चा करा.

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- कायदेविषयक माहिती या विषयावर संवाद साधा.
- सहभागींना विचारून या विषयाशी संबंधित 3-4 शब्द लिहा. हे शब्द त्यांचे आपल्या भाषेतले असू शकतात. जसे – कायदेविषयक डावपेच यासाठी 'कायद्याचं प्रकरण' 'कोर्टाचा लोचा' इत्यादी.

■ ही गोष्ट वाचा आणि खाली दिलेली चित्रे पाहून स्वत: गोष्ट पूर्ण करा.




उषाचे एक छोटेसे घर आहे. ती शिवणकाम करते. त्यातूनच तिचा उदरनिर्वाह चालतो. तिच्या पतीचे तीन वर्षांपूर्वीच निधन झाले. तिला दोन मुले आहेत. ती शाळेत शिकतात. उषाच्या घराजवळच ज्ञानबाची फॅक्टरी आहे. तिने आपले घर ज्ञानबाला विकावे यासाठी ज्ञानबा तिच्यावर सतत दबाव टाकतो. खरंतर ज्ञानबाला तिथे आपली नवीन फॅक्टरी उघडायची आहे.






मोफत सहायता केंद्र

## वजनाबद्दल जाणून घेऊया!

| | | |
|---|---|---|
| 1 किलोग्रॅम | = | 1000 ग्रॅम |
| अर्धा किलोग्रॅम | = | 500 ग्रॅम |
| एक चतुर्थांश किंवा पाव किलोग्रॅम | = | 250 ग्रॅम |

प्रश्न 1. आपले वजन किती आहे? मोजा आणि लिहा. ____________


प्रश्न 2. आपल्या मित्राचे वजन किती आहे ? ____________

प्रश्न 3. वजन करा. लिहा आणि सांगा कोणाचे वजन जास्त आहे – आपले की आपल्या मित्राचे ? ____________



- एका फुलकोबीचे वजन किती असेल ?

____________



- चंदाने एक किलोग्रॅम साखर विकत घेतली, परंतु तिला साखरेचे वजन पाहून ती एक किलोग्रॅम नाही असे वाटले. तिने दुसऱ्या दुकानात जाऊन साखरेचे वजन करून घेतले, तर साखरेचे वजन एकूण ९०० ग्रॅम भरले, तर चंदाला दुकानदाराने किती साखर कमी दिली ?

____________




- दुकानदाराने वजनात कमी साखर दिल्याबद्दलची तक्रार आपण कोठे नोंदवाल?

____________

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करू या!**


- प्रथम वजनाबद्दलची माहिती देऊन सहभागींना वजनांची, मापांबद्दलची जसे किलोग्रॅम, ग्रॅम याचा अनुभव देऊ या.
- जास्त वजनाच्या वस्तूंचे वजन मोजण्यासाठी किलोग्रॅमचा उपयोग होतो. कमी वजनाच्या वस्तू मोजण्यासाठी ग्रॅमचा उपयोग होतो. किलोग्रॅमला किग्रॅ व ग्रॅमला ग्रॅ. पण लिहू शकता.

- 5 किग्रॅ गहू 100 रु. ला येतो, तर 25 किग्रॅ गव्हाची किंमत किती होईल ? ____________

- 30 किग्रॅ गहू विकत घेण्यासाठी आपण कोणकोणत्या आणि किती नोटा द्याल ? ____________




## वजन मोजण्याची वजन मापे




- शारदा भाजी विकत घेण्यासाठी बाजारात गेली, तिने एकूण किती रुपयांची भाजी विकत घेतली, त्याचा हिशेब करा.

| अ. क्र. | भाजीचे नाव | दर (रुपये) प्रति किलोग्रॅम | किती घेतली | रुपये दिले (किंमत) |
|---|---|---|---|---|
| 1 | बटाटे | 20 | 2 किलोग्रॅम | |
| 2 | कांदे | 15 | 1 किलोग्रॅम | |
| 3 | टोमॅटो | 25 | 3 किलोग्रॅम | |
| 4 | भोपळा | 10 | अर्धा किलोग्रॅम | |
| | | | एकूण रुपये | |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करू या!**

- सहभागींना आवर्जून सांगा, की ज्या–ज्या वेळी ते दुकानातून सामान खरेदी करतील, त्या–त्या वेळी दुकानदाराकडून न विसरता बिल घ्या. तसेच त्याच्या उपयोगावरही चर्चा करा. जर आपल्याला वाटले, की विकत घेतलेली सामग्री निर्धारित वजनापेक्षा कमी आहे, तर तुम्ही दुकानदाराकडे सामग्री ठेवलेल्या पारड्यात वजन व वजनाच्या पारड्यात सामग्री ठेवून पुन्हा वजन करून घेऊ शकता. जर आपल्याला वाटले, की दुकानदाराकडील वजन प्रमाणित नाही, तर आपण वजने व मापे नियंत्रक कार्यालयात जाऊन तक्रार करू शकता. वजन मोजण्यासाठी अलीकडे डिजिटल मशीनचाही उपयोग केला जात आहे. डिजिटल मशीनवर वजन करण्यापूर्वी, मशीन शून्यावर सेट आहे याची निश्चिती केली पाहिजे. अशा मशीनचा उपयोग आजूबाजूला कुठे केला जात आहे यावर चर्चा करा.

## ▪ वाचा आणि समजून घ्या.

आईने एक मोठी भाकरी केली. तिने भाकरीचे बरोबर दोन भाग केले. त्यातील एका भागातील अर्धा – अर्धा भाग आपल्या दोन मुलांना, रोहन आणि राणीला दिला. चित्र पाहून सांगा. कोणाला किती भाग मिळाला ?

| | असे म्हणतात | असे वाचतात | असे लिहितात |
|---|---|---|---|
|  | 1 पूर्ण | पूर्ण | 1 |
|  | अर्धा | दोन समान भागांपैकी एक भाग | $\frac{1}{2}$ एक द्वितीयांश |
|  | चतकोर / एक चतुर्थांश | चार समान भागांपैकी एक भाग | $\frac{1}{4}$ एक चतुर्थांश |

- भाकरीचा किती भाग उरला ?
- रोहनने भाकरीचा किती भाग खाल्ला ?
- राणीने भाकरीचा किती भाग खाल्ला ?




- जर आईने भाकरीचे तीन बरोबर भाग केले, तर असे भाग झाले असते –


1 पूर्ण = 1


दोन तृतीयांश $\frac{2}{3}$


एक तृतीयांश $\frac{1}{3}$

आता मुलांना आधीपेक्षा जास्त हिस्सा मिळेल का ?


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- एक चतकोर म्हणजेच एक चतुर्थांश समजावून सांगणे.
- सहभागींना दैनंदिन जीवनातील अशीच काही उदाहरणे देऊन चर्चा करा. कागदाच्या घड्या घालून किंवा खड्यांच्या मदतीनेही चर्चा करता येईल.

- खालील सारणीत पिकांची विभागणी दिलेली आहे. काही ठिकाणी काही अंक पुसले गेलेले आहेत, सारणी भरण्यासाठी मदत करा.

| पिके | एकूण उत्पादन (पोती) | एकूण उत्पादनातील अर्धा भाग (पोती) | एकूण उत्पादनातील एक चतुर्थांश भाग (पोती) |
|---|---|---|---|
| वाटाणा | 24 | | |
| हरभरा | 32 | | |
| गहू | 40 | 20 | |
| ज्वारी | | | 5 |
| बाजरी | 22 | | साडेपाच किंवा पाच आणि अर्धा |

- सुंदरलालजींकडे 40 एकर जमीन आहे. सुंदरलालजींना सुशील आणि शीला ही दोन मुले आहेत. दोन्ही मुलांमध्ये जमिनीचे सारख्या प्रमाणात वाटप झाले. पुढील चित्रातून पाहूया पुढील पिढीसाठी जमिनीचे वाटप कसे झाले.




- 40 एकरला 2 बरोबर भागांमध्ये वाटले

$40 \div 2 =$

- 20 एकरला 2 बरोबर भागांमध्ये वाटले

$20 \div 2 =$

- 20 एकरला 4 बरोबर भागांमध्ये वाटले

$20 \div 4 =$

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- जमीन किंवा अन्य वस्तूंचे सारख्या प्रमाणात वाटप करून घेऊन, भाग ही संकल्पना समजून देण्यासाठी चर्चा करा.

## टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शिकलेल्या शब्दांचे लेखन करण्यास सांगा.
- मदत कशी मिळवावी याबाबत चर्चा घडवून आणा.
- व्यावहारिक उदाहरणांतून बेरजेचा सराव घ्या.

## वर्णमाला

अ आ इ ई उ ऊ ए ऌ

अॅ ऐ ओ ऑ औ अं अः ऋ

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व श

ष स ह ळ

क्ष ज्ञ

## श्रेय नामावली

- **लेखन व निर्मिती सहभाग :**

  **डॉ. सुचिता राऊत,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्रीम. माधुरी देशमुख,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्री. शीतल वडनेरकर,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. शाळा क्र. २, वेरूळ (कन्या) ता. आर्वी, जि. वर्धा.
  **श्रीम. शुभांगिनी वासनिक,** शिक्षिका,
  जि. प. शाळा, सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
  **श्रीम. दीपा गिरी,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. केंद्र शाळा, तळेगाव (टा.), ता. वर्धा, जि. वर्धा.
  **श्रीम. नेहा साळुंखे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.
  **श्री. सूरज सावळे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.

